**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ याची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : शैलजा दिलीप दाणी**
वय सुमारे : ५८ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त,
नेमणूक : फ्लॅट क्र.३, ओंकार अपार्टमेंट, कौठघाट रोड, भा.भा. नगर., जि.नाशिक.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.जी.ए. भोसले:**

१. एप्रिल २०१६ पासुन मी महाराष्ट्र कृषी उद्योग विभाग विकास महामंडळ मर्यादित, नाशिक येथे लेखा व प्रशासन अधिकारी या पदावर प्रभारी म्हणुन कार्यरत होते. सन २०१२ ते सन २०१६ या दरम्यान लेखा व प्रशासन अधिकारी म्हणुन श्री.एम.आर. तायडे, श्री. सुरवाडे व श्री. एस.के. जाधव हे काम पहात होते. लेखा व प्रशासन अधिकारी यांना विभागीय कार्यालयातून बनविलेल्या पावत्यांची तपासणी करणे, आलेल्या पैशांची धनाकर्ष तपासणे व कार्यालयामार्फत केले जाणारे पेमेंटवर सहया करणे इत्यादी कामे असतात. नाशिक विभागाअंतर्गत नाशिक व अहमदनगर या दोन जिल्हयांचा समावेश होतो. सदर जिल्हयांमध्ये खते, किटकनाशके, कृषी अभियांत्रीकी, नोगा व पशुखाद्य विभाग आहेत.

२. जरी नाशिक विभाग असला तरी अहमदनगर जिल्हयाअंतर्गत होणा—या विभागाचे व्यवहाराचे पैसे हे अहमदनगर जिल्हयातील आमच्या कार्यालयात येतात व तेथुन ते कार्यालयाचे एच.डी.एफ.सी. बॅकेच्या खात्यात जमा होत असतात. त्या जिल्हयात झालेल्या व्यवहाराची माहिती व पावत्या नाशिक विभागाला दिली जाते व त्यानुसार नाशिक विभागाच्या कार्यालयामध्ये संगणकावर तशी नोंद घेतली जाते.

३. जुलै २०१७ मध्ये आमच्या महामंडळाचे पुरवठादार मे.लक्ष्मी ड्रंकेन्स, सोलापुर यांनी पंपसंचाची रक्कम तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कर्जत यांच्याकडुन महामंडळाकडे रक्कम प्राप्त झालेली आहे व ती त्यांना

अदा करावी अशी विनंती केली. मी जेव्हा अहमदनगर जिल्हयाचे आमच्याकडे असलेल्या पावत्या व संगणकातील नोंदींची तपासणी केली असता तालुका कृषी अधिकारी यांच्याकडुन अशी कोणतीही रक्कम जमा झाल्याची नोंद मिळुन आली नाही. मे.लक्ष्मी ड्रंकेन्स यांनी सांगितलेल्या धनादेश क्रमांकाची आमच्या अभिलेखावर असणा—या पावत्यांमध्ये पाहणी केली असता तो धनादेश मे.उन्मेश फर्टीलायझर्स, चांदा यांच्या खात्यावर जमा झालेले असल्याचे माझे निदर्शनास आले व तसे मी त्यांना कळविले. मी सदर व्यवहाराबाबत अहमदनगर जिल्हयातील लिपीकांनी त्या नोंदीबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरच्या व्यवहाराची नोंद अनावधानाने / नजरचुकीने झाली असल्याचे सांगितले. तसे त्यांनी लेखी निवेदनही दिलेले आहे. सदरचे लेखी निवेदन आरोपी रामदास कुलट यांनी व त्यावर राजेंद्र कोल्हे यांनी देखील सही केलेली आहे. आम्ही जेव्हा अभिलेखाची पाहणी केली तेव्हा आम्हाला आणखी चुकीचे व्यवहार झाले असल्याबाबत आढळुन आले. पहिल्या लेखी निवेदनानुसार आम्ही कुलट यांना ज्ञापन व त्याची प्रत कोल्हे यांना दिली होती. जेव्हा पुन्हा चुकीचे व्यवहार आढळले तेव्हा आम्ही त्याबाबत आमच्या मुख्य कार्यालयाला तोंडी कळविले होते.

४. महामंडळाचे मुख्य कार्यालयाने कळविलेल्या प्रकाराबाबतची सविस्तर चौकशी करणेकामी श्री.वासुदेव महाले यांच्या अंतर्गत सत्यशोधन समिती नेमली. श्री.महाले यांनी पंचायत समिती व तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयीन अभिलेख तेथे जावुन पाहिले व आवश्यक दस्तांच्या छायांकित प्रती घेतल्या व त्याची पडताळणी नाशिक विभागातील असणा—या नोंदीसोबत घेतली. त्यानंतर महाले यांनी त्यांचा सत्यशोधन अहवाल बनविला व आमच्या मुख्य कार्यालयात सादर केला. महाले यांना त्यांच्या तपासणी दरम्यान तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती यांच्या नावाच्या रकमा या खाजगी खत वितरक, खाजगी शेतकरी व काही बचतगट यांच्या नावे बनल्याचे आढळले. त्यामुळे गैरव्यवहार झाला असे दिसुन आले. त्यानंतर मुख्य कार्यालयाच्या निर्देशनानुसार नाशिक विभागाच्या विभागीय

व्यवस्थापकांनी पोलीसात तक्रार दिली.

मध्यांतरामुळे पुढील सरतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
Date: 2023.06.06 16:53:18 +0530

( माया अ. देशमुख )

**दि.०६/०६/२०२३** अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर

अभियोग पक्षातर्फे दस्तऐवज दाखल करण्याचा अर्ज आल्याने आरोपीतर्फे त्यावर म्हणणे देवुन युक्तीवाद करण्यासाठी तोंडी मुदत मागितल्याने पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती,

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
Date: 2023.06.06 16:53:26 +0530

( माया अ. देशमुख )

**दि.०६/०६/२०२३** अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.८, अहमदनगर